# ZILLA PARISHAD NASHIK




## Monthly Newsletter January 2026

# मनोगत...

जिल्हा परिषद नाशिकच्या जानेवारी या मासिक अहवालाचे सादरीकरण करताना मला अत्यंत आनंद होत आहे. आपल्या सर्वांच्या सहभागातून आपण एक सक्षम, सर्वसमावेशक आणि प्रगतिशील नाशिक घडवण्यासाठी सातत्याने करत असलेल्या प्रयत्नांचे हे संक्षिप्त प्रतिबिंब आहे. खऱ्या अर्थाने विकास तेव्हाच घडतो जेव्हा तो शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतो आणि त्याचा दीर्घकालीन परिणाम दिसून येतो ही आमची भूमिका आमच्या प्रत्येक उपक्रमामध्ये दिसून येते.

गेल्या महिन्यात लोकाभिमुख सेवा अधिक सक्षम बनवणे, शिक्षणाची गुणवत्ता वाढवणे, महिलांना सक्षम करणे, आरोग्य सेवा सुधारणा व ग्रामीण प्रशासनाला वेग देणे या क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित केले. स्वावलंबी नाशिक मोहिमेअंतर्गत दिव्यांग व्यक्तींना UDID कार्डाची सुलभ उपलब्धता, विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात येणारा विद्यार्थी अधिकारी वाचन संवाद उपक्रम तसेच घरकुल प्रवेश उपक्रम राबवले जात आहेत .

हे सर्व उपक्रम जिल्हा परिषद प्रशासनातील गाव पातळीवर काम करणारे सर्व कर्मचारी, नागरी संस्था, CSR संस्था आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या सामूहिक ऊर्जेचे फलित आहे. आपल्या विश्वास आणि सहकार्याबद्दल मी मनापासून आभार व्यक्त करतो. आगामी काळातही पारदर्शक प्रशासन, तंत्रज्ञानाधारित सेवा वितरण, आणि प्रत्येक व्यक्तीला सन्मान, समता व सक्षमीकरण देणारा विकास हे ध्येय घेऊन जिल्ह्याच्या विकासास तत्पर राहू.

हा मासिक अहवाल आपल्याला ग्रामीण भागातील परिवर्तनात्मक कामाशी अधिक जोडेल आणि प्रेरणा देईल, अशी मला खात्री वाटते. चला, आपण सर्वांनी नव्या ऊर्जा आणि सामूहिक जबाबदारीने प्रगतीच्या या प्रवासात पुढे वाटचाल करूया.

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री. ओमकार नीलम मधुकर पवार (भा. प्र.से)**



# Table of *Content*


1 नाशिक जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाची उल्लेखनीय कामगिरी

2 स्वावलंबी नाशिक मोहिमेंतर्गत चांदवड येथे *UDID* कॅम्प यशस्वी

3 राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत नाशिक जिल्ह्याची विक्रमी कामगिरी

4 नवचेतना अभियानांतर्गत राज्यस्तरीय पुनर्विवाह वधु-वर परिचय मेळावा संपन्न

5 निपुण महाराष्ट्र अभियान : सीईओंचा थेट शाळांशी संवाद

6 जिल्हा परिषदेच्या ७ सेवा 'आपले सरकार' पोर्टलवर उपलब्ध

7 ई-संजीवनी *OPD* वापरात नाशिक जिल्हा देशात अग्रस्थानी

# Table of *Content*


8 ‘अरुणोदय’ सिकलसेल ॲनिमिया विशेष मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ

9 मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत नाशिक जिल्ह्यास भेट

10 *PESA API* इंटिग्रेशनसाठी जिल्हा परिषद–युनियन बँक सामंजस्य करार

11 प्रजासत्ताकदिनी ७५ हजार घरकुल लाभार्थ्यांचा एकत्रित गृहप्रवेश

ZILLA PARISHAD NASHIK | JAN 2026

# January Major HIGHLIGHTS

We as a Zilla Parishad Nashik, love to share the key news, achievements and highlights of the month. This newsletter will help to see the major works done by the ZP Nashik in the January month.






## नाशिक जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाची उल्लेखनीय कामगिरी

नाशिक जिल्ह्यातील उसवाड (ता. चांदवड), जातेगाव (ता. नाशिक) आणि ओझर (ता. निफाड) येथील आयुष्मान आरोग्य मंदिर – प्राथमिक आरोग्य केंद्रांना केंद्र सरकारचे राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानक (NQAS) प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

केंद्र शासनाच्या तज्ज्ञ समितीमार्फत झालेल्या बाह्य तपासणीत या केंद्रांनी 90% पेक्षा अधिक गुण मिळवत दर्जेदार आरोग्य सेवा, रुग्ण समाधान व संसर्ग नियंत्रणात उत्कृष्ट कामगिरी सिद्ध केली.

या यशामुळे संबंधित केंद्रांना अतिरिक्त प्रोत्साहन निधी मिळणार असून ग्रामीण भागातील आरोग्य सेवांचा दर्जा अधिक उंचावणार आहे.



## स्वावलंबी नाशिक मोहिमेंतर्गत चांदवड येथे UDID कॅम्प यशस्वी

जिल्हा परिषद नाशिकच्या वतीने ‘स्वावलंबी नाशिक’ मोहिमेअंतर्गत चांदवड तालुक्यात दिव्यांग नागरिकांसाठी UDID (Unique Disability Identity) कॅम्प यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आला.

या कॅम्पमध्ये एकूण 369 दिव्यांग नागरिकांची UDID नोंदणी पूर्ण करण्यात आली. UDID कार्डमुळे दिव्यांग व्यक्तींना विविध शासकीय योजना, सवलती व सुविधा एकाच ओळखीवर सुलभपणे उपलब्ध होणार आहेत.

## ‘राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत नाशिक जिल्ह्याची विक्रमी कामगिरी

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (RBSK) अंतर्गत नाशिक जिल्ह्यात अंगणवाडी व शालेय वयोगटातील बालकांची व्यापक आरोग्य तपासणी करण्यात येत असून 2024–25 या वर्षात शंभर टक्के हृदय व इतर आवश्यक शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. जन्मदोष, आजार, पोषणतूट व विकासात्मक विलंब यांचे वेळीच निदान करून मोफत उपचार व शस्त्रक्रिया उपलब्ध करून देण्यात आल्या. 80 मोबाइल हेल्थ टीम्स, DEIC व एम्पॅनेल्ड सुपर स्पेशॅलिटी रुग्णालयांच्या समन्वयामुळे ग्रामीण व गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.






## नवचेतना अभियानांतर्गत राज्यस्तरीय पुनर्विवाह वधु-वर परिचय मेळावा संपन्न

जिल्हा परिषद नाशिकच्या नवचेतना अभियानांतर्गत एकल महिला व पुरूषांसाठी राज्यस्तरीय, सर्व जातीय पुनर्विवाह वधु-वर परिचय मेळावा विल्होळी येथे उत्साहात पार पडला.
पुनर्विवाह हा सामाजिक पुनर्जन्म असून एकल महिलांना सन्मान, सुरक्षितता व आत्मविश्वास देणे ही समाजाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ओमकार पवार यांनी केले. या मेळाव्यास राज्यभरातून मोठा प्रतिसाद लाभला असून सामाजिक पुनर्वसन व सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.



---



## निपुण महाराष्ट्र अभियान : सीईओंचा थेट शाळांशी संवाद

नाशिक जिल्हा परिषदेने विद्यार्थ्यांच्या मूलभूत साक्षरतेत सुधारणा करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. केवळ कागदी अहवालावर अवलंबून न राहता, अधिकारी आता तपासणी (Inspection) करण्याऐवजी विद्यार्थ्यांशी थेट संवाद (Connection) साधण्याला प्राधान्य देत आहेत. थेट संवाद: यावेळी ते स्वतः विद्यार्थ्यांचे वाचन ऐकून त्यांच्या 'निपुण' क्षमतेचा अंदाज घेत आहेत.
100 दिवसांचे वाचन अभियान: हा उपक्रम सध्याच्या वाचन अभियानाशी जोडला आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीकडे लक्ष देण्यासाठी अधिकारी निवडलेल्या शाळांना दर 15 दिवसांनी पुन्हाऑनलाइन व्हीसी च्या माध्यमातून संवाद साधणार आहेत. आतापर्यंत नाशिक, बागलाण, कळवण, मालेगाव आणि सिन्नर या 5 तालुक्यांमधील 30 हून अधिक विद्यार्थ्यांची चाचपणी या माध्यमातून झाली आहे.

TO READ MORE CLICK HERE

## जिल्हा परिषदेच्या ७ सेवा 'आपले सरकार' पोर्टलवर उपलब्ध

जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत ग्रामविकास विभागाच्या 7 महत्त्वाच्या सेवा आता महाराष्ट्र शासनाच्या 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध झाल्या आहेत.

या सेवांमुळे नागरिकांना घरबसल्या अर्ज सादर करणे, अर्जाची स्थिती पाहणे व दाखले वेळेत मिळवणे शक्य होणार आहे. डिजिटल सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घेऊन वेळ, खर्च व फेऱ्या टाळाव्यात, असे आवाहन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ओमकार पवार यांनी केले आहे.

## ई-संजीवनी OPD वापरात नाशिक जिल्हा देशात अग्रस्थानी

जिल्हा परिषद नाशिक शिक्षण विभागाच्या विनोबा ॲप या डिजिटल शिक्षण उपक्रमात उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षकांचा 'पोस्ट ऑफ दी मंथ' म्हणून सन्मान करण्यात आला. ऑक्टोबर व नोव्हेंबर 2025 मध्ये नाविन्यपूर्ण अध्यापन, स्पेलिंग बी, वाचन व शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या शिक्षकांचा मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या हस्ते गौरव झाला. यावेळी पवार यांनी विनोबा ॲपच्या माध्यमातून अधिकाधिक शिक्षकांनी आपले नाविन्यपूर्ण उपक्रम शेअर करण्याचे आवाहन केले.




## 'अरुणोदय' सिकलसेल ॲनिमिया विशेष मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ

जिल्हा परिषद नाशिक शिक्षण विभागाच्या विनोबा ॲप या डिजिटल शिक्षण उपक्रमात उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षकांचा 'पोस्ट ऑफ दी मंथ' म्हणून सन्मान करण्यात आला. ऑक्टोबर व नोव्हेंबर 2025 मध्ये नाविन्यपूर्ण अध्यापन, स्पेलिंग बी, वाचन व शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या शिक्षकांचा मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या हस्ते गौरव झाला. यावेळी पवार यांनी विनोबा ॲपच्या माध्यमातून अधिकाधिक शिक्षकांनी आपले नाविन्यपूर्ण उपक्रम शेअर करण्याचे आवाहन केले.






## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत नाशिक जिल्ह्यास भेट

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी नाशिक जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींना भेट देत विकासकामांची पाहणी व ग्रामस्थांशी संवाद साधला. "गावाचा विकास ही निरंतर प्रक्रिया असून प्रत्येकाने ग्रामविकासात सक्रिय सहभाग घ्यावा," असे आवाहन त्यांनी यावेळी केले. जिल्हा परिषदेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ओमकार पवार यांनीही ग्रामस्थांशी संवाद साधत लोकसहभागातूनच ग्रामस्वराज्य बळकट होईल, असे प्रतिपादन केले.




## PESA API इंटिग्रेशनसाठी जिल्हा परिषद–युनियन बँक सामंजस्य करार

पेसा अंतर्गत 5% थेट निधी योजनेचे वितरण अधिक पारदर्शक व गतिमान करण्यासाठी जिल्हा परिषद नाशिक व युनियन बँक ऑफ इंडिया यांच्यात PESA API Integration संदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. या प्रणालीद्वारे पेसा ग्रामपंचायतींना निधी थेट DBT पद्धतीने ऑनलाईन हस्तांतरित केला जाणार असून विलंब व मानवी हस्तक्षेप टाळता येणार आहे.

ही डिजिटल प्रणाली पेसा कायद्याच्या उद्दिष्टांना पूरक ठरून ग्रामीण स्वराज्य अधिक बळकट करेल, असे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ओमकार पवार यांनी सांगितले.




## प्रजासत्ताकदिनी ७५ हजार घरकुल लाभार्थ्यांचा एकत्रित गृहप्रवेश

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व राज्यशासन पुरस्कृत घरकुल योजनांतर्गत नाशिक जिल्ह्यातील 75 हजार लाभार्थ्यांनी प्रजासत्ताकदिनी एकाचवेळी नव्या घरात गृहप्रवेश केला.

जिल्हा परिषद, पंचायत राज संस्था व ग्रामपंचायतींच्या समन्वयातून हा ऐतिहासिक उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

गरजू कुटुंबांना सुरक्षित निवारा, स्थैर्य व सन्मानाचे जीवन देण्याचा जिल्हा परिषद नाशिकचा संकल्प या उपक्रमातून साकार झाला.

प्रधान मंत्री आवास योजना–ग्रामीण
Pradhan Mantri Awaas Yojana-Gramin



# Photo Gallery



जि.प. : नवचेतना अभियानांतर्गत प्रजासत्ताक दिनी एकल महिलांच्या हस्ते ध्वजपूजन

मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण व आवास योजनांचा ई गृहप्रवेश






पंचायतराज विभागाचे मुख्य सचिव एकनाथ डवले यांच्या हस्ते भावली बुद्रुक येथे भेट घरकुल व अभ्यासिकेचे उद्घाटन

https://zpnashik.maharashtra.gov.in/

FOR MORE INFORMATION CLICK HERE